दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरुवार ६ फेब्रुवारी २०२५ | अंक५१ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

आत्मसमाधान ही खरी समृद्धी आहे; ती प्राप्त करण्याचा प्रयत्न करा.

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

# तर मराठवाड्याचा दुष्काळ भूतकाळ होईल, देवेंद्र फडणवीसांनी थेट प्लॅनच सांगितला

## बीडमधील आष्टी उपसा सिंचन योजना क्र. ३ पाईपलाईन कामाची पाहणी केली

### दरवर्षी विजेचे भाव कमी करणार

पुढचे पाचही वर्ष दरवर्षी विजेचे भाव कमी करणार आहोत. घरगुती आणि औद्योगिक विजेचे भाव कमी करणार आहोत. शेतकरी कंपनीमुळे आपली ९० हजार कोटींची बचत होत आहे. त्यामुळे आपल्या ग्राहकांना आपण दिलासा देत आहोत. आपलं सरकार सामान्य लोकांच्या पाठिशी आहे. त्यांच्या जीवनात परिवर्तन झालं पाहिजे असेही ते म्हणाले.



बीडमधील आष्टी उपसा सिंचन योजना क्र. ३ अंतर्गत येर्णाया शिंपोरा ते खुंटेफळ पाईपलाईन कामाची पाहणी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. यानतंर त्यांनी याठिकाणी बोगदा कामाचा शुभारंभही केला. या कार्यक्रमला देवेंद्र फडणवीसांसह आष्टीचे आमदार सुरेश धस, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे उपस्थित होत्या. या कार्यक्रमा दरम्यान देवेंद्र फडणवीसांनी भाषण केले. या भाषणावेळी देवेंद्र फडणवीस यांनी आमदार सुरेश धस यांचे कौतुक केले. भविष्यात आधुनिक भगीरथ म्हणून ज्यांचा उल्लेख होणार ते सुरेश धस, असेही देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.देवेंद्र फडणवीसांनी बीडमध्ये केलेल्या भाषणावेळी मराठवाड्याला दुष्काळमुक्त कसे करता येईल, याचाही प्लॅन सांगितला. तसेच त्यांनी घरगुती आणि औद्योगिक वापराची बिले कमी करण्याबद्दलही भाष्य केले.त्यामुळे मराठवाडा दुष्काळमुक्त होईल मराठवाडा जर दुष्काळमुक्त करायचा असेल तर वाहून जाणारं ५३ टीएमसी पाणी गोदावरी खो-यात आलं पाहिजे. ते जर आलं तर मराठवाड्याच्या या पिढीने दुष्काळ पाहिला. पुढची पिढी दुष्काळ पाहणार नाही. मराठवाड्याचा दुष्काळ भुतकाळ होईल. आपण मागेच जीआर काढला. पण सरकार गेलं, त्यामुळे काम झालं नाही. पुन्हा शिंदे यांच्या नेतृत्वात सरकार आलं. जलसंपदा खातं माझ्याकडे आलं. त्यावेळी चार नदीजोड प्रकल्प तयार केले. त्याचा पाठपुरावा सुरू केला. सर्व अडचणी दूर केल्या. सर्व्हेक्षणाचे टेंडर काढले. आता हे काम पूर्णपणे मार्गी लागली आहे. मूळ संकल्पना बाळासाहेब विखे पाटलांनी मांडली. त्यांचे पुत्र राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडेच काम दिलं आहे. वर्ष भरात हे नदीजोड प्रकल्पाचं काम आपण सुरू करू. आणि ५३ टीएमसी पाणी गोदावरीच्या खो-यात आणू. त्यामुळे मराठवाडा दुष्काळमुक्त होईल असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.मराठवाड्यातील पुढच्या पिढीला दुष्काळ पाहू द्यायचा नाहीनाशिक आणि नगर विरुद्ध उरलेला मराठवाडा असा संघर्ष पाहायला मिळतो. जायकवाडीतून पाणी देतो म्हटलं तर इथून सुखरुप निघेल. पण संभाजीनगरला सुखरुप राहील का. नदीजोड प्रकल्पानंतर जायकवाडीत भरपूर पाणी येणार आहे. तेव्हा तुम्हाला पाणी द्यायला कोणी नकार देणार नाही. काही झालं तरी मराठवाड्यातील पुढच्या पिढीला दुष्काळ पाहू द्यायचा नाही. मोदींना आम्ही विनंती केली. आपण आंतरराज्य नदीजोड प्रकल्पांना पैसे देता. आम्हाला चारही प्रकल्प राज्यांतर्गत करायचे आहे. त्याला मान्यता द्या. मोदी म्हणाले, तुम्ही आमच्याकडे पाठवा. आम्ही त्यालाही मान्यता देऊ, असेही देवेंद्र फडणवीसांना म्हटले.उपसा सिंचन योजना म्हटली तर त्याला खूप वीज लागते. त्याचं बिल कोणी द्यायचं, किती द्यायचं याची अडचण तयार होते. त्यामुळे राज्यातील उपसा सिंचन योजना आपण सोलरवर टाकणार आहोत. ही योजनाही सोलरवर टाकली जाणार आहे. त्यामुळे शेतक-यांवर उपसा सिंचनचा येणारा अतिरिक्त बोजा येणार नाही, असेही त्यांनी सांगितले. घरगुती आणि औद्योगिक वापराची बिले कमी करण्याचा निर्णय शेतक-यांना १२ तास वीज मिळाली पाहिजे, यासाठी मुख्यमंत्री सोलर वीज वाहिनी सुरू केली होती. आपण शेतक-यांना वीज पुरवठा करण्यासाठी स्वतंत्र कंपनी तयार केली होती. आपल्या राज्यात शेतक-यांना १६ हजार मेगावॅट वीज देतो. ती सोलरमधून येतील. हे प्रकल्प लवकर पूर्ण होणार आहे. त्यामुळे शेतक-यांना वीज देणार आहोत. त्यामुळे शेतक-यांना १२ महिने वीज मिळणार आहे.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आज नांदेडात सभा



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आभार यात्रेच्या अनुषंगाने आज दि.६ फेब्रुवारी रोजी नविन मोंढा येथील मैदानात दुपारी १ वाजता जाहीर सभा होणार आहे. यानिमित्ताने यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज दुपारी १२ वाजता मुंबई येथून विमानाने नांदेड विमानतळावर दाखल होणार आहेत. दुपारी १२:३० पर्यंत विश्रामगृह मार्गावर त्यांचे स्वागत केले जाणार आहे. यानंतर शिवसेनेचे सर्व आमदार व पदाधिका-यांसोबत ते सचखंड गुरुद्वा-यात दर्शन घेणार आहेत. दुपारी १ ते ३ पर्यंत नवा मोंढा येथील मैदानावर नागरीक व लाडक्या बहीणींचे आभार व्यक्त करण्यासाठी होणा-या सभेस संबोधित करणार आहेत. सायंकाळी ५ वाजता शिवमळा मरळक फाटा येथे आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसेनेच्या पदाधिक-यांसोबत बैठक होणार आहे.

## ग्राहकाकडून भाजी विक्रेत्यावर चाकूने वार, पुणं हादरलं

पुण्यामध्ये गेल्या काही दिवसांमध्ये गुन्हेगारी अतिशय वाढली असून त्यामुळे सामान्य नागरिकांना मात्र जीव मुठीत धरून जगावं लागतंय. अशातच पुण्यातून अतिशय धक्कादायक बातमी समोर आली आहे. भाजी खरेदी करताना झालेल्या वादातून एका ग्राहकाने भाजीविक्रेत्यावर थेट वार केल्याची घटना घडली आहे. खडकी येथील संजय गांधी भाजी मंडईत हा धक्कादायक प्रकार घडला. त्यामुळे प्रचंड खळबळ माजली आहे. भाजी विक्रेत्याच्या खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी खडकी पोलिसांनी आरोपी ग्राहकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.
मिळालेल्या माहितीनुसार, मनोज



स्वामी (रा. इंदिरानगर, खडकी) असे गुन्हा दाखल केलेल्या ओरोपीचे नाव आहे. मनोज यांच्या हल्ल्यात भाजी विक्रेते शौकत बाबामियाँ (वय ३६, रा. दर्गा वसाहत, खडकी) हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहे. नेमकं काय झालं ?खडकीतील संजय गांधी भाजी मंडईत शौकत बाबामियाँ यांचाभाजी विक्री व्यवसाय आहे. मंगळवारी रात्री साडेआठच्या सुमारास आरोपी मनोज स्वामी हा तेथे खरेदीसाठी आला होता. मात्र भाजी विकत घेत असताना मनोज स्वामीने शौकत यांच्याशी वाद घालण्यास सुरूवात केली, तसेच त्यांना शिवीगाळही केली. बघता बघता त्यांचा वाद वाढत गेला आणि बाचाबाचीतून आरोपीने हा हल्ला केला. त्याने शौकत यांच्या गळ्यावर तसेच चेह-यावर चाकूने सपासप वार केले. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या शौकत यांना मंडईतील इतर भाजी विक्रेत्यंनी रुग्णालयात दाखल केले. मात्र या हल्ल्यानंतर आरोपी मनोज पसार झाला असून, खडकी पोलिसांनी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सहायक निरीक्षक अर्जुन बेंदगुडे अधिक तपास करत आहेत.

## नॅशनल अबॅकस स्पर्धेत सिद्धी घोडके हिची गरुड झेप



नुकत्याच कोल्हापूर येथे पार पडलेल्या प्रो ॲक्टिव्ह नॅशनल अबॅकस स्पर्धेत एस. के. एस. कोचिंग व अबॅकस क्लासेस बीड, येथील विद्यार्थिनी सिद्धी घोडके हिने देश पातळीवर प्रथम क्रमांक मिळवत घवघवीत यश संपादन केले.
या दोन दिवसीय स्पर्धेत देशभरातून एकूण ४५०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.
यात सिद्धि घोडके हिने १०० गणिते सहा मिनिटाच्या आत सोडवत १०० पैकी १०० गुण मिळवून देशात प्रथम क्रमांक मिळवला यासाठी सर्वोच्च ट्रॉफी तसेच सायकल व प्रमाणपत्र याने तिचा सन्मान करण्यात आला.
सिद्धीच्या या यशासाठी सर्व स्तरातून सिद्धी घोडके हिचे कौतुक करण्यात येत आहे.
आपण फक्त एक करा की चांगलं काम करणाऱ्याच्या पाठीवर शाब्बासकीची थाप मारा,त्यांना प्रोत्साहन द्या आणि शक्य असल्यास सक्रिय मदतही करा.सामाजिक काम हाती घेतले
की काहीही कमी पडत नाही असे सांगत त्यांनी त्यांची संघटना चालवत असलेल्या उपक्रमाची माहिती दिली.मोबाईलवरचा ऍक्टिव्ह टाइम कमी करून तो विधायक कामासाठी वापरा असंही ते म्हणाले.

## धनादेश अनादरामुळे केलेला दंड बीडसत्र न्यायालयाकडून रद्द : ॲड.गंडले

बीड - प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी की, आरोपी जावेद रहीम सय्यद हा पुणे येथे मजुरी कामासाठी गेला होता. त्या ठिकाणी त्याची ओळख फिर्यादी सोबत झाली. त्यावेळी फिर्यादी हा शिक्षण घेण्यासाठी पुणे येथे गेला होता, हे दोघे जण शेजारी राहत असल्यामुळे ओळख झाली. त्यानंतर फिर्यादीकडुन आरोपीने रुपये ५,००,०००/- घर बांधकामासाठी हातऊसणे घेतले व सदरीलची रक्कम मुदतीत दिली नाही. म्हणुन फिर्यादीने आरोपीने दिलेला धनादेश दिनांक १६/११/२०१५ रोजी बँकेत वटवण्यासाठी टाकला असता तो अनादरीत झाला. त्यामुळे फिर्यादीने मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी मा. श्रीमती के.सी. बागल यांच्याकडे प्रकरण दाखल केले. सदरील प्रकरणात आरोपी व फिर्यादी यांच्याकडुन युक्तीवाद झाला. त्यावेळी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती के.सी. बागल यांनी आरोपीस कलम १३८ निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट नुसार ६ महिने शिक्षा व रक्कम रुपये ८,००,०००/- फिर्यादीस देण्यास सांगितली व तीन महिन्यात रक्कम दिली नाही. ६ महिने शिक्षा अशा प्रकारचा निर्णय दिला. सदरील प्रकरणात आरोपी जावेद सय्यद यांनी बीड जिल्हा न्यायालयातील नामांकीत विधीज्ञ ॲड. अविनाश पं. गंडले यांच्या मार्फत अपील दाखल केले. त्यामध्ये दोन्ही बाजुचा युक्तीवाद घेवुन व मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे ग्राह्य धरुन मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश साहेब, बीड यांनी दिनांक ०१/०२/२०२५ रोजी निर्दोष मुक्तता केली. आरोपी तर्फे ॲड. अविनाश गंडले यांनी काम पाहीले, त्यांना ॲड. विशाल वडमारे, ॲड. इम्रान पटेल, ॲड. बप्पा माने, ॲड. किरण मस्के, ॲड. सुरक्षा जावळे, ॲड. सचिन गिरी, ॲड. राजेश शिंदे यांनी सहकार्य केले.

# संतोष देशमुख प्रकरण आम्ही दाबू देणार नाही, काय म्हणाले जरांगे पाटील

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख निर्घृण हत्या प्रकरण आम्ही दाबू देणार नाही, समाज आमच्या बाजूने आहे असे मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. देशमुख कुटुंब न्यायाच्या प्रतिक्षेत आहे, न्यायासाठी वणवण फिरत आहे.या प्रकरणात लवकरात लवकर ॲड. उज्वल निकम यांची नेमणूक व्हायला हवी,हे देशमुख कुटुंब साधंभोळं कुटुंब आहे, पण मी लक्ष ठेवून आहे असा इशाराच मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला दिला आहे.देशमुख कुटुंबीयांशी माझी आज चर्चा काही नाही झाली, मी दवाखान्यातच होतो, आज सुट्टी झाली आता त्यांची भेट झाली आहे. पण हे प्रकरण आम्ही दाबू देणार नही, समाज पाठीशी आहे असेही जरांगे पाटील यावेळी म्हणाले. देवेंद्र फडणवीस यांनी सांगावे कारवाई कधी होईल. उज्वल निकम यांची नियुक्ती झाली का ? मोबाईल कधी मिळणार?, आम्हाला तर शंका आहे धनंजय मुंडेच्या घरी मोबाईल ठेवला का? असा आरोप जरांगे पाटील केला आहे.फरार आरोपीला मुंडेनी लपवून ठेवला असेलगाडीवाला कुठं आहे? फरार आरोपी इथंच असायला पाहिजे बीड, नगर, बुलढाणा- सिन्नर या भागात असेल. त्याला धनंजय मुंडे यांनी लपवून ठेवला असेलःगाडीवाला कुठं आहे? देशमुख यांना धमकी देणार कुठे आहेत, घर देणारा, पैसे देणा-यांना सहआरोपी केलं का? असाही सवाल जरांगे यांनी केला आहे. शिवाजी नगर पोलिस स्टेशनच्या इन्स्पेक्टरची चौकशी झाली का?, डॉक्टरांची चौकशी केली का ? मुख्यमंत्री काय करत आहेत? हे सर्वांना माहित आहे, देशमुख कुटुंबियांनी विश्वास ठेवला आहे. त्यांचा





गैरफायदा घेऊ नका देशमुख कुटुंब भोळभाबडं आहे, आरोपी सुटू देऊ नका असे आवाहन जरांगे यांनी केले आहे.

## फोन धनंजय मुंडेलाच केला का?

करमाड्या ( कराड ) ३०२ मध्ये आलाय का?, मोक्क्यात आलाय का? , १२० ब मध्ये तो आलाय का?, मला शंका आहे. यामध्ये एका बड्या नेत्याला फोन गेला होता, तो बडा नेता कोण आहे आम्हाला कळू द्या जराःविष्णू चाटे याने एका बड्या नेत्याला फोन केला होता, मग धनंजय मुंडेलाच केला का? विष्णू चाटेनं जो मोबाईल वापरला, तो मोबाईल कुठं आहे? धनंजय मुंडेचे सीडीआर काढले का? अशी प्रश्नांची सरबत्ती जरांगे यांनी केली आहे.

## संपादकीय

### किती मी राखू तुमची

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प वक्री जाऊ नयेत यासाठीच्या आपल्या धडपडीचे अधिक कौतुक करावे की आपल्याविषयीचे अंदाज तंतोतंत खरे ठरावेत यासाठी ट्रम्प अध्यक्षपदी आल्यापासून आपण अहोरात्र करत असलेल्या प्रयत्नांचे अधिक, हे ठरवणे अवघड. अमेरिकी वाहनांवर आपल्या देशात लावल्या जाणाऱ्या कराविषयी ट्रम्प रागावलेले आहेत. हा राग त्यांनी अनेकदा जाहीरपणे व्यक्त केलेला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा अमेरिकी दौरा सुरू होण्यासाठी या मुद्द्यावर ट्रम्प यांस शांतफ करणे गरजेचे. त्यातूनच ताज्या अर्थसंकल्पात हे आयात शुल्क तब्बल ५० टक्क्यांनी कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला असून हे आयात शुल्क आता १२५ टक्क्यांवरून ७० टक्के इतके कमी होईल. याचा अर्थ केवळ हार्ले डेव्हिडसनफ दुचाकीच नव्हे तर इलॉन मस्क यांची टेस्लाफ वीज कारही भारतात स्वस्त होऊ शकेल. हे अर्थातच ट्रम्प यांस खूश करण्यासाठी. त्यात पंतप्रधानांचा संभाव्य अमेरिका दौरा. या पार्श्वभूमीवर आपण अमेरिकेसमोर असे कंबरेत वाकत असताना ट्रम्प यांनी ताज्या तलवारबाजीत त्यांच्या शेजारील मेक्सिको, कॅनडा आणि दूरवरील चीन या देशांवर अतिरिक्त कर लागू केले. शेजारील मेक्सिको, कॅनडा यासाठी ते २५ टक्के इतके असतील तर चीनसाठी १० टक्के. म्हणजे या तीन देशांची उत्पादने अमेरिकेत इतक्या टक्क्यांनी महाग होतील आणि अमेरिकेच्या मोटारी, दुचाक्या यांच्या किमती भारतात तितक्या टक्क्यांनी कमी होतील. हे दोन्ही एकाच दिवशी झाले. यावरून या निर्णयाचे महत्त्व जसे लक्षात येते तसेच हे असे निर्णय घेणाऱ्यांची मानसिकताही दाखवून देते. ट्रम्प यांनी जे केले त्याचे वर्णन जागतिक स्तरावर ङ्गव्यापारयुद्धाचे रणशिंगफ, ङ्गनव्या व्यापारयुद्धास सुरुवातफ आदी शब्दांत केले जाते. ते योग्यच. तथापि त्यावर भाष्य करताना एक प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे तो म्हणजे, आपले काय होणार? याचे कारण ट्रम्प चीनविरोधात फोडत असलेल्या डरकाळ्यांमुळे आपल्याकडे एका वर्गास होत असलेल्या गुदगुल्या. आपल्या शत्रूचा काटा परस्पर काढला जात असेल तर ते कोणास आवडणार नाही? पण चीनविषयी ट्रम्प यांच्या भूमिकेकडे इतक्या कोत्या नजरेने पाहणे हेच आपल्यासाठी अयोग्य असू शकते, हे सत्य लक्षात घेणे महत्त्वाचे. याचा अर्थ असा की ट्रम्प जितके चीनविरोधात डरकाळ्या फोडत आहेत तितके ते खरोखरच त्या देशाविरोधात जाऊ इच्छितात का हा प्रश्न. तशी त्यांची खरोखरच इच्छा असती तर त्यांनी चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांस जातीने स्वत:च्या अध्यक्षावरोहणाचे निमंत्रण दिले नसते. ट्रम्प यांनी ज्यांना वैयक्तिक निमंत्रणे दिली त्यात क्षी वरच्या यादीत आहेत, ही बाब विसरता नये. तसेच त्यांनी कोणास तसे निमंत्रण दिले नाही याकडेही दुर्लक्ष करता नये. ट्रम्प हे केवळ जिनपिंग यांस शपथविधी सोहळ्यास निमंत्रण देण्यावरच थांबलेले नाहीत, ही आपल्यासाठी आणखी गंभीर बाब. अध्यक्षपदी आरूढ झाल्यावर ट्रम्प यांनी काही जागतिक नेत्यांस स्वत: जातीने फोन केले आणि आगामी वाटचालीची चर्चा केली. त्यातही चीनचे जिनपिंग यांचा समावेश होता. ट्रम्प यांनी स्वत:हून असा फोनसंपर्क कोणाशी साधला नाही, हे सांगण्याची गरज नाही. जिनपिंग यांच्याशी तो साधला ही बाब अधिक महत्त्वाची. असे असताना चीनविरोधात ट्रम्प किती टोकाला जातील, या प्रश्नाचा विचार गांभीर्याने करायला हवा. कारण या प्रश्नाच्या प्रामाणिक उत्तरावर आपण आणि चीन तसेच अमेरिका आणि आपण यांचे भावी संबंध अवलंबून आहेत. ट्रम्प यांच्या आधीचे डेमॉक्रॅट्स जो बायडेन आपल्याकडे चीनच्या नजरेतून पाहत. म्हणजे चीन या साम्यवादी, हुकूमशाही देशास पर्याय म्हणून त्यांच्या नजरेतून भारताची उपयुक्तता होती. त्यामुळे चीनचे नाक खाजवण्यासाठी, त्या देशास इशारा देण्यासाठी वा चीनविरोधातील प्यादे या अर्थाने डेमॉक्रॅट्सच्या नजरेत भारताचे महत्त्व होते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय निर्बंध लादलेल्या रशियाशी असलेल्या आपल्या संबंधांकडे अमेरिकेने काणाडोळा केला.

# तणावामुळे मानसिक आरोग्यावर होणारा तीव्र परिणाम

या ताणाचे परिणाम माणसाच्या शरीरावर आणि मनावरसुध्दा वेगाने होताना दिसत आहे. उच्च रक्तदाब, मधुमहे व ह्रदयरोग, कर्करोग, लठ्ठपणा याबरोबरच डिप्रेशन, ॲंकझायटी यासारखे मानसिक आजारसुद्धा तणावाचे फलित असू शकतात.ङ्गमग आता करायचं काय? हा ताणाव कसा कमी करायचा? आपण आपल्या मनाचे नैसर्गिक गुणधर्म तर बदलू शकत नाही आणि बाह्य जगातील वेगाने होणारे बदल व प्रगतीवर आपले नियंत्रण नाही. पण आपण आपल्या तनावाला कमी करून आरोग्य संपन्न जीवनशैली नक्कीच अवलंबू शकतो. १) आपण तणावाच्या खोलात जावून हा तणाव आपल्या आयुष्यात कसा तयार होतो आहे ते समजून घ्यावा. २) तणावाची कारणे असंख्य असतात. याच्या मुळाशी कोणाला ना कोणत्या प्रकारची भिती ही भावना असते ही नीती पुढे उद्भवू शकणार्या ठिकाणी अपयश वा अपेक्षेपेक्षा कमी परमार्फन्स करण्याची असेल, घरात नात्यामध्ये कटूता, कौटूंबिक किंवा प्रेमाच्या व्यक्तीच्या काळजीच्या स्वरुपातील नीतीसुध्दा तणावाच्या मुळाशी असू शकते. तर हा तणाव कमी करण्यासाठी आपण काय करावे? तणावाचा तुमच्या शारीरिक आणि आरोग्यावर परिणाम होतो. तेंव्हा चिंता, नैराश्य किंवा पॅनीक ॲटॅक, छाती दुखणे,




ह्रदय गती वाढणे, थकवा, अपचन, झोप न लागणे किंवा जास्त झोप येणे सतत डोकेदुखी या सर्वाचा अनुभव होत असेल शारिरीक तणाव उपाय १) तुमच्या आयुष्यातील तणावमुक्तीसाठी आपण आपला तणाव ओळखला पाहिजे, त्या माहित करणे, शोधले पाहिजे. शारिरीक आणि भावनिकदृष्ट्या कसे वाटते व तणावासाठी तुमची प्रतिक्रिया माणसाच्या आयुष्यातला एकटेपणा जितका वाढतो तितका तणाव देखील वाढू लागतो. एखादी गोष्ट स्वतःकडेच ठेवणे आणि त्यावर वारंवार विचार करणे यामुळे पण तणाव होतो; तो कमी करण्यासाठी इतरांमध्ये मिसळणे, मित्र-मैत्रिणींना वेळ देणे किंवा कुठेतरी बाहेर फिरायला जाणे. २) तणाव दूर करण्यासाठी तुम्ही निसर्गाच्या सानिध्यात ठरू शकता नैसर्गिक वातावरण फिरल्याने त्यांना दूर होतो. ३) नियमित व्यायाम केल्याने नकारात्मक विचार दूर होतील आणि स्वतः मधला आत्मविश्वास वाढेल. ४) योगा किंवा ध्यान केल्यामुळे देखील तणाव दूर होतो. मानसिक तणाव उपाय १) मानसिक तणाव दूर करण्यासाठी योग्य आय म्हणजे अनावश्यक विचारात वेळ न घालवणे. तुम्ही शक्य तितके व्यस्त राहण्याचा प्रयत्न करा. तुमच्या आवडीचे छंद जोपासा. एखादी कला अंगी बाळगा आणि त्यासाठी तुमचा वेळ द्या. २) तुम्ही सकारात्मक विचार करा आणि संकटाला समोर जाणं सोपं जातं यामुळे तुमचा आत्मविश्वास वाढेल. ३) तणावमुक्त दिवस घालवण्यासाठी सकाळी मोबाईल वापरू नका मोबाईल पासून पुढे दूर राहा आणि गरज असेल तेव्हा मोबाईल वापरा. तणाव हा एक मानसिक अवस्थेची व्याधी आहे. कोणताही प्रसंग अथवा प्रासंगिक बदलाला दिलेली नकारात्मक शारीरिक व भावनिक प्रतिसाद मनातील अनावश्यक व नकरात्मक विचारांच्या गर्दीमुळे मनाची जी स्थिती होते तो ताण असतो. सध्याच्या धावत्या जीवनशैलीमध्ये तणाव खुप जास्त झाला आहे. आपल्याला जास्त काम पडले तरी तनाव येतो किंवा काम नसेल तरी तणाव येता. या ताणामुळे मनुष्याच्या शारिरीक व मानसिक आरोग्यावर परिणाम होतो, ताण भावनात्मक किंवा शारीरिक तणावाची भावना असते. हे कोणालाही घटनेतून किंवा विचारातून येऊ शकते, ज्यामुळे आपण निराश, रागावले किंवा चिंताग्रस्त असतात. मागील काही वर्षामध्ये आपली अर्थव्यवस्था, सामाजिक, व्यवस्था- कामाच्या पद्धती, कामाच्या वेळा, जीवनशैली झपाट्याने बदल सामावून घेण्याची आणि अनुकूलन करण्याचर जास्तच क्षमता आहे, पण ज्या वेगाने आपल्या आसपासची परिस्थिती बदलते आहे. त्या समोर मा मव मनाच्या अनुकूलन क्षमतेचा वेग फारच कमी आहे, आणि आपल्या जीवनातील आज तणावांचे मूळ कारण आह

## शिक्षण विभाग व वेतन अधीक्षक यांचा ढिसाळ कारभार ! वेतन उशिरा होत असल्याने कर्मचा-यांमध्ये असंतोष !

जालना( वार्ताहर ) दि 4 माध्यमिक शिक्षणाधिकारी मंगला धुपे गायकवाड व प्रभावी वेतन अधीक्षक तथा कार्यालयीन अधीक्षक मकरंद सेवलीकर यांच्या ढिसाळ कारभारामुळे गेल्या तीन चार महिन्यांपासून जिल्ह्यातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर होत नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष पसरला आहे. सविस्तर वृत्त असे की , मागील 3 ते 4 महिन्यापासून विद्यार्थ्यांचे आपार आयडी जनरेट करण्याचे काम शालेय स्तरावरून सातत्याने सुरू आहे. सर्व कर्मचारी आपार आय डी जनरेट करण्यासाठी रात्रंदिवस शर्थींचे प्रयत्न करत आहेत.त्यामध्ये क्षेत्रीय स्तरावर अनंत अडचणी येत आहेत. पालकांचे संमती पत्र असल्याशिवाय हे आपार आयडी जनरेट होत नाही. त्यातल्या त्यात काही पालक उसतोडीसाठी किंवा त्यांच्या उदरनिर्वाहासाठी बाहेरगावी असल्याने त्यांचे संमती पत्र व आधार कार्ड मिळविण्यासाठी अडचण येत आहे तर काही आधार कार्ड दुरूस्ती नसल्यामुळे आपार आयडी जनरेट होत नाही असे अनंत अडथळे येत असतांना आणि काही तांत्रिक अडचणी येत असतांना देखील आधार प्रमाणित असलेल्या विद्यार्थ्यांचे 100% आपार आय डी जनरेट झाले पाहिजे.असा माध्यमिक शिक्षणाधिकारी यांचा आग्रह आहे जालना जिल्हा या कामांमध्ये सर्वात मागे आहे.यासाठी शिक्षणाधिकारी यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना विश्वासात न घेता वेतन थांबवण्याचे तोंडी आदेश वेतन अधीक्षकांना दिले व वेतन अधीक्षकांनीही त्याचे काटेकोर पालन केले. त्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांचे वेतन रखडले आहे त्याचा परिणाम कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन आर्थिक व्यवहारावर झाला आहे.विविध बँकांकडून घेतलेले गृहकर्ज,वाहन कर्ज यांचे हप्ते थकल्यामुळे त्याचा नाहक दंड त्यांना सोसावा लागत आहे.वेतन करण्यासाठी मराठवाडा शिक्षक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांशी वारंवार केलेल्या चर्चेद्वारे व वेळोवेळी केलेल्या पाठपुराव्यामुळे वेतन करण्यासाठी हालचाली सुरू झाल्या.परंतु विद्यार्थ्यांची आपार आयडी जनरेट करणे ही वर्षभर सतत चालणारी प्रक्रिया आहे. यासाठी शालेय शिक्षण विभागाकडून वेतन थांबविण्या संबंधीचे कोणत्याही प्रकारचे लेखी आदेश नसतांना शिक्षणाधिकारी यांनी कर्मचाऱ्यांना वेतनासाठी वेठीस धरणे ही बाब संयुक्तिक नाही ही गोष्ट शिक्षणाधिकारी यांच्या लक्षात आणून दिल्यानंतर शिक्षणाधिकारी यांनी वेतन करण्यास होकार दिला. यापुढे वेतनासाठी कर्मचाऱ्यांना वेठीस धरल्यास मराठवाडा शिक्षक संघ लोकशाही मार्गाने शिक्षणाधिकारी व वेतन अधीक्षक कार्यालयासमोर विविध प्रकारचे आंदोलन करेल असा इशारा मराठवाडा शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष रमेश आंधळे,सचिव संजय येळवंते, केंद्रीय कार्यकारणी उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे,सदस्य प्रेमदास राठोड, आरेफ कुरेशी, मार्गदर्शक डॉ मारोती तेगमपुरे, डॉ पुरूषोत्तम जुन्ने, कोषाध्यक्ष नारायण मुंडे, कार्याध्यक्ष बाबासाहेब बिडवे, फरखुंद अली सय्यद ,उपाध्यक्ष भीमाशंकर शिंदे, जगन वाघमोडे, सहसचिव गणेश चव्हाण,प्रद्युम्न काकड,दीपक शेरे,सदस्य तुकाराम पडघन,युवा शहराध्यक्ष सोहम बोदवडे,इमरान सिद्दिकी,महिला प्रतिनिधी ज्योती मगर पांगारकर, शिरीन शहा शेख यांनी दिला आहे.

# बीड शहरातील नगरोत्थान योजनेंतर्गत सिमेंट रस्त्यावरील खड्डे अपघाताला निमंत्रण ; नगरविकास मंत्री, सचिवांना तक्रार:- डॉ.गणेश ढवळे

बीड:- ( दि.०५ ) बीड शहरातील नगरोत्थान योजनेतुन पहिल्या टप्प्यात ७० कोटी आणि दुस-या टप्प्यात ६९ कोटी अशी तब्बल १४९ कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या सिमेंट रस्ते व नाली बांधकाम पैकी काही रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाली असुन माने काम्प्लेक्स ते यशवंतराव चव्हाण नाट्यगृह रोडवरील रस्त्याची वर्षभरातच दुरावस्था झाली. माय कॉम्प्लेक्स ते यशंतराव चव्हाण नाट्यगृह हा रस्ता मोठ्या रहदारीचा रस्ता आहे विविध व्यवसाय दुकाने क्लासेस दवाखाने या रस्त्यावर आहेत त्यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात कायम वर्दळ या ठिकाणी असते. रस्त्याच्या मधोमध पडलेल्या मोठ्या खड्ड्यांमुळे याठिकाणी अपघाताच्या घटना घडलेल्या आहेत. अशा प्रकारची स्थिती अनेक ठिकाणी रस्त्यांवर आढळून येत आहे तर सिमेंट रस्त्यांची कामे करताना रस्त्यांच्या मधोमध वाहतूकीस अडथळा व अपघाताला निमंत्रण ठरणारी रोहित्र व वीजेचे खांब हटविण्यात आले नाहीत.संबधित प्रकरणात कारवाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर , शेख युनुस,रामनाथ खोड,शिवशर्मा शेलार, पांडुरंग हराळे , बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, बीड जिल्हाध्यक्ष आप माजी सैनिक अशोक येडे यांनी जिल्हाधिकारी बीड, मुख्याधिकारी नगरपालिका बीड यांच्या मार्फत उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथजी शिंदे, सचिव नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांना लेखी निवेदनाद्वारे केली असुन दि.१० सोमवार रोजी त्याच खड्ड्यात ङ्गबेशरमांची वृक्षलागवडङ्घ करून लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा दिला आहे.

स्थानिक नागरिकांनी खड्डा बुजवण्याचा अनेक वेळा प्रयत्न केला परंतु निष्फळ ; ब्लॉक कट करून बसविण्यात यावा :- चाणक्यपुरी, विद्यानगर,माने कॉम्प्लेक्स रहिवाशांची मागणी



बीड शहरातील माने काम्प्लेक्स ते यशवंतराव चव्हाण नाट्यगृह दरम्यान वर्षभरापूर्वी तयार करण्यात आलेल्या नवीन सिनेंट रस्त्यांवर तडे आणि मोठमोठे खड्डे पडले असुन त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. माने कॉम्प्लेक्स ते यशवंतराव चव्हाण नाट्यगृह हा रस्ता मोठ्या रहदारीचा रस्ता आहे विविध व्यवसायिक दुकाने शाळांचे क्लासेस दवाखाने याच रस्त्यावर आहेत त्यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात कायम वर्दळ या रस्त्यावर असते परंतु या रस्त्याच्या मधोमध मोठा खड्डा पडलेला आहे. या खड्ड्यात वाहनांचे चाक अडकून पडल्याने घसरून अनेक जणांचा अपघात झाला आहे . याबाबत नागरिकांनी वेळोवेळी प्रशासनाकडे तक्रारी केल्या आहेत. परंतु त्याकडे नगर परिषद प्रशासनाकडून दुर्लक्ष करण्यात आले. अखेर नाईलाजाने या भागातील नागरिकांकडून माती खड्डे टाकून तो बुजवण्याचा प्रयत्न केला होता .परंतु काही दिवसातच ती माती ,खडी निघून जाते .काही नागरिकांनी त्यामध्ये सिमेंट क्राक्रीट टाकले होते .परंतु नव्याने टाकलेले कॉंक्रीट जुन्याला पकड धरत नसल्यामुळे ते लगेच निघून जाते .पाऊस पडला किंवा पाणी साचल्यास खड्डा दिसत नाही. त्यावेळी अनेकांना पाठीच्या मणक्याला दणका बसण्याचा अनुभव या ठिकाणी आलेला आहे. नगरपालिका प्रशासनाया समस्यांकडे लक्ष देऊन लवकरात लवकर खड्डा बुजवावा व नागरीकांना त्रासातुन मुक्त करावी अशी मागणी सचिन आदनाक,दिपक कुलकर्णी, अर्जुन काळे, ईश्वर गुंजाळ,प्रशांत माने या नागरिकांनी केली आहे.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार ६ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com



# आ.संदीप क्षीरसागरांनी घेतला विविध विभागांचा आढावा

## महसूल, बांधकाम, कृषी, जिल्हा परिषदेची आढावा बैठक

बीड मतदारसंघातील विविध विषयांच्या अनुषंगाने आ.संदीप क्षीरसागर यांनी महसूल विभागांतर्गत बीड व शिरूर कासार तहसिल कार्यालय, सार्वजनिक बांधकाम तसेच जिल्हा परिषदेतील बांधकाम, ग्रामीण पाणीपुरवठा विभागांची बैठक घेऊन आढावा घेतला. यावेळी या विभागांशी निगडित नागरिकांच्या तक्रारींचा निपटारा करण्याचे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी अधिकार्यांना दिले. मतदारसंघातील सामान्य लोकांची सरकारी कार्यालयात अडकलेली कामे तसेच जनसामान्यांच्या तक्रारींच्या अनुषंगाने तसेच विभागांतर्गत होत असलेले कामकाज यांचा आढावा घेण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि.४) रोजी बीड येथील शासकीय विश्रामगृहात बैठक घेतली. महसूल विभागांतर्गत



बीड व शिरूर कासार तहसिल कार्यालय, कृषी विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच जिल्हा परिषद अंतर्गत बांधकाम विभाग, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना आदी विभागांचा आ.क्षीरसागर यांनी आढावा घेतला. यावेळी या विभागांशी संबंधित नागरिकांच्या असलेल्या तक्रारी यांचा निपटारा करण्याबात आ.संदीप क्षीरसागर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले. तसेच आ.क्षीरसागर यांनी या विभागांतर्गत झालेल्या आणि होत असलेल्या कामकाजाचा आढावा घेतला. या बैठकीस माजी आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह विविध विभागांचे



## डॉ.प्रकाश महिंद्रे यांचे दुःखद निधन

बीडच्या माजी खासदार स्व. केशरबाई क्षीरसागर यांचे जावई व माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांचे मेव्हणे डॉ. प्रकाश महिंद्रे यांचे दि. ०२ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी पुणे येथे त्यांचे घरी ह्रदय विकाराने दुःखद निधन झाले. डॉ.प्रकाश महिंद्रे हे महाराष्ट्र शासनाच्या फलोउत्पादन विभागाचे संचालक होते. त्यांनी त्यांच्या काळात हजारो एकर शेतीवर फळबागा निर्माण केल्या. डॉ. प्रकाश महिंद्रे हे मुळचे दिग्रस जि.यवतमाळ येथील असुन त्यांनी जिल्हा मृदु संधारण अधिकारी म्हणुन कामास सुरुवात केली. पुढे त्यांची विभागीय मृद संधारण अधिकारी



म्हणून पदोन्नती झाली. त्यांनी अकोला, नाशिक व पुणे या विभागात सेवा केली. पुढे शासनाने त्यांची फलोउत्पादन संचालक म्हणून निवड केली. त्यांच्या विभागात उत्कृष्ठ कामगिरी केल्याबद्दल शासनाने त्यांचा गौरव केला. तत्कालीन लोकसभा अध्यक्ष बळराम जाखड यांच्या हस्ते त्यांना प्रियदर्शनी अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले होते. त्यांचा महाराष्ट्रात मोठा चाहता वर्ग आहे. त्यांनी नागपुर विद्यापीठातुन एम.एस.सी.पदवी धारण केली होती. त्यांच्या पश्चात पत्नी डॉ. प्रिया महिंद्रे, एक मुलगा, स्नुषा व दोन मुली असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे

## राष्ट्रीय समाज पक्षाची मराठवाडा विभागीय बैठक

### राष्ट्रीय समाज पक्षाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी अण्णासाहेब मतकर यांची फेर निवड

राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर साहेब यांच्या आदेशानुसार बीड मध्ये मराठवाडा विभागीय बैठक संपन्न झाली. महाराष्ट्रातील सर्व पदाधिकाऱ्यांची पदमुक्त करण्यात आले होते ,त्यानंतर पुन्हा नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या या निवडी राष्ट्रीय समाज पक्षाचे मुख्य महासचिव माऊली नाना सलगर. मराठवाडा अध्यक्ष आश्रुबा कोळेकर. चितळकर साहेब. ताटे साहेब. जिल्हा संपर्कप्रमुख चौरे सर. भगवान माने सर या सर्वांच्या उपस्थितीमध्ये मराठवाड्यातील जिल्हाध्यक्षांच्या निवडी करण्यात आल्या , येणाऱ्या काळात जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपालिका महानगरपालिका व इतर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका



डोळ्यासमोर ठेवून पक्षामध्ये नवीन फेरबदल करण्यात आलेले आहेत, राष्ट्रीय समाज पक्ष हा ताकतीने सर्व निवडणुकींना सामोरे जाणार आहे त्यामुळे पक्षात अठरापगड जातींच्या लोकांना सोबत घेऊन जास्तीत जास्त उमेदवार कसे निवडून येतील यावर भर दिला जाणार आहे , त्यामुळे राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रत्येक तालुक्यात बांधणी करून सर्कलवाईज कार्यकर्त्यांची फळी तयार करून व प्रस्थापितांच्या विरोधात गोरगरिबांना वेट इस धरणाऱ्या व सत्ता ही आपली जहागिरी समजणाऱ्या सर्वांना राष्ट्रीय समाज पक्ष येणाऱ्या काळात पर्याय असेल ज्या अठरापगड जातील वंचित लोकांना सत्तेपासून विकासापासून वंचित ठेवले आहे त्यांच्यासाठी राष्ट्रनायक महादेवजी जानकर साहेब यांनी लढण्याचा निर्धार केला आहे व त्यांची विचारधारा घेऊन सर्व कार्यकर्ते कामाला लागले आहेत येणारा काळ हा नक्कीच. राष्ट्रीय समाज पक्षाचा काळ असेल त्यामुळे क्षणिक फायदा किंवा आमिषाला बळी न पडता सर्व जातीतील विचारवंतांनी विचार करून सकारात्मक व आपल्या हिताच्या माणसाला मदत करावी. यामध्ये बीड जिल्ह्याच्या राष्ट्रीय समाज पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी प्रा, अण्णासाहेब मतकर यांची निवड करण्यात आली.

## आदित्य कृषी महाविद्यालयाचा रूपेश कापूरकरची कृषी अधिकारीपदी निवड

आदित्य शिक्षण संस्थेतून पदवी घेऊन बाहेर पडलेला विद्यार्थी यशस्वी होतोच याचे समाधान वाटते. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा. त्यांच्या कला गुणांना वाव मिळावा. यासाठी महाविद्यालयात विविध स्पर्धा, तज्ज्ञांचे व्याख्यान, स्पर्धा परिक्षेची तयारी वेगवेगळे डे निमित्त विविध कार्यक्रम घेऊन पुस्तकी ज्ञानाबरोबर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास कसा होईल याकडे भर दिला जात असल्याने आज गोरगरिबांचे मुल शिक्षण घेऊन शासकीय नौकरी, विविध संस्थेत अधिकारी होतात याचे समाधान



आहे. यशस्वी विद्यार्थी घडवणे हे संस्थेचे ध्येय असल्याचे प्रतिपादन आदित्य शिक्षण संस्थेचे संचालक डॉ. आदित्य सारडा यांनी केले. आदित्य कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा विद्यार्थी रुपेश कापूरकर याची क्षेत्रीय ग्रामीण बँक मध्ये कृषी अधिकारी पदी निवड झाली. या निवडीबद्दल रूपेश याला शुभेच्छा देताना संस्थेचे संचालक डॉ. आदित्य सारडा बोलत होते. आयबीपीएस मार्फत क्षेत्रीय ग्रामीण बँक मध्ये विविध पदावर नियुक्ती बाबत राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आलेल्या परीक्षेतून पात्र उमेदवारांची निवड केली जाते. त्यामध्ये आदित्य कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचा रुपेश कापूरकर क्षत्रिय ग्रामीण बँक मध्ये कृषि अधिकारी डउ-डएखख या पदासाठी पात्र ठरला आहे. रूपेशने २०१४ ते २०१८ या काळात आदित्य कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात इ. ढशलह (असीळश्र एपसस) पदवी पूर्ण केली. या परीक्षेत यश मिळवल्या बद्दल संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा महाविद्यालयाचे प्राचार्य कल्याण आपेट,प्राचार्य अमोल सानप, प्राचार्य शाम भुतडा, प्राचार्य सतीश कचरे यांनी अभिनंदन केल

## वाल्मिक कराडला मोठा दिलासा, हायकोर्टाने ईडी चौकशीची याचिका फेटाळली

मुंबई : मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या आणि खंडणी प्रकरणात अटकेत असलेला आरोपी वाल्मिक कराड याला दिलासा मिळाला आहे. वाल्मिक कराडविरोधात ईडी चौकशीची मागणी करणारी याचिका हायकोर्टानं फेटाळली आहे. त्याशिवाय, हायकोर्टाने याचिकाकर्त्याला २० हजारांचा दंड ठोठावला आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे बीड जिल्हाच नव्हे तर राज्यातील वातावरण ढवळून निघाले होते. सरपंच असलेल्या संतोष देशमुख यांची हत्या वाल्मिक कराडच्या सहकाऱ्यांनी केली असल्याचा आरोप आहे. वाल्मिक कराडविरोधात रान उठवण्यात आल्यानंतर त्याच्या अनेक संपत्ती आणि कारनामे समोर आले होते. सुरुवातीला देशमुख हत्या प्रकरणाशी संबंधित असलेल्या प्रकरणात वाल्मिक कराडला अटक झाली. त्यानंतर आता कराडसह इतर आरोपींना आता हत्या प्रकरणातही अटक करण्यात आली असून मकोका लावण्यात आला आहे. वाल्मिक कराडने बेकायदेशीर कृत्य करत बेनामी संपत्ती जमवल्याचा आरोप करण्यात आला. त्याची कोट्यवधींची संपत्ती असल्याचेही समोर आले.या सगळ्या पार्श्वभूमीवर आरटीआय कार्यकर्ता केतन तिरोडकर यांनी वाल्मिक कराडची ईडी चौकशी करण्याची मागणी करणारी याचिका दाखल केली. मात्र, हायकोर्टाने गी याचिका फेटाळून लावली.

## बीड शहरातील आधार कार्ड केंद्र चालकाकडून सर्वसामान्य नागरिकांची होतेय लूट : ज्ञानेश्वर कवठेकर

बीड : देशातील सर्वच नागरिकांसाठी आधार कार्ड हे मूलभूत गरज आहे त्यामुळे घरातील प्रत्येक नागरिकांचे आधार कार्ड काढणे गरजेचे आहे त्याशिवाय सरकारी योजनेचा लाभ घेता येत नाही तसेच शाळा, कॉलेज, बँक मध्ये आधार कार्ड सक्तीचे केले आहे जर एखाद्या व्यक्तीकडे आधार कार्ड नसेल तर त्या व्यक्तीला सरकारच्या कल्याणकारी योजनांन पासून वंचित राहावे लागते तसेच विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेशासाठी आधार कार्डची मागणी केली जाते आधार कार्ड वरील किरकोळ बदल




जसे की मोबाईल नंबर, नाव, पत्ता, जन्मतारीख अपडेट करण्यासाठी नागरिकांना आधार केंद्रावर जावे लागते त्या ठिकाणी गेल्यानंतर आधार केंद्र चालकांकडून नागरिकांची सर्रासपणे लूट करत आहेत. बीड शहरातील पंचायत समिती, सरकारी दवाखाना, शाहू नगर पोस्ट ऑफिस मधील आधार कार्ड केंद्र चालकाकडून सर्वसामान्य नागरिकांची लूट होत आहे केंद्र व राज्य सरकारने विविध कामांसाठी आधार संलग्न करणे बंधनकारक केले आहे मात्र शासनाचे आधार सेंटर बंद आहेत

## अज्ञात व्यक्तीने पेटवला ऊस, शेतकऱ्याचं लाखोचं नुकसान



अडीच एकर क्षेत्रात असलेला उभा ऊस पेटवून दिल्याची घटना आपेगाव (ता. पैठण) शिवारात सोमवारी (दि.३) दुपारी अडीच वाजेदरम्यान घडली. यामध्ये शेतकऱ्याचा ऊस जळून खाक झाला असल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले. सोमवारी दुपारी अडीच वाजेच्या संभाजीनगरलाच राहतात. आज ऊसतोडणी असल्याने ते गावाकडे गेले होते. दुपारी ऊस तोडणी सुरू असताना अज्ञात व्यक्तीने दुसऱ्या दिशेने उसाला पेटून दिले आहे. फडात आग लागल्याचे ऊसतोड मजुरांच्या लक्षात आले असता त्यांनी ही आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. परंतु तोपर्यंत उसाच्या पाचटाने पेट घेतल्याने आग लवकर आटोक्यात आली नाही. तोपर्यंत ऊस जळून खाक झाला होता. यात तळेकर यांचे दोन लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. दरम्यान, महसूल विभागाने याचा पंचनामा करून आर्थिक मदत द्यावी अशी मागणी त्यांनी केली आहे. सुमारास पैठण तालुक्यातील इंदेगाव येथील बळीराम सखाराम तळेकर यांची आपेगाव येथे शेती आहे. त्यांच्या अश्रडीच एकर शेतातील ऊस अज्ञाताने पेटवून दिला. ऊस हा गावातील नातेवाईकांना बटाईने दिला होता

## युथ फॉर माय भारत विशेष हिवाळी शिबिराचे भव्य उद्घाटन

आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या ॲड. बी. डी. हंबर्डे महाविद्यालय, आष्टी यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे ब्रह्मगाव, ता. आष्टी, जि. बीड येथे युथ फॉर माय भारत या विशेष हिवाळी शिबिराचे उद्घाटन मंगळवार दि ४ फेब्रुवारी रोजी उत्साहात पार पडले. या शिबिराचे उद्घाटन सुधाकर यादव, गट शिक्षण अधिकारी, आष्टी यांच्या हस्ते संपन्न झाले. या प्रसंगी ग्रामपंचायत सरपंच रोहिदास पवार, उपसरपंच अशोक सानप, ग्रामपंचायत सदस्य शिवाजी सानप, सचिन हराळ, नवनाथ नवसुपे, रविंद्र निंबाळकर, किरण कुळपे, मुकेश आगलावे, बंडू पवार, अंबादास पवार हे मान्यवर उपस्थित होते. तसेच, ग्रामसेवक पालवे आणि तलाठी



चव्हाण साहेब यांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. बाबासाहेब मुटकुळे, उपप्राचार्य प्रा. अविनाश कंदले, कार्यक्रम अधिकारी गट समन्वयक डॉ. रवी सातभाई, कार्यक्रम अधिकारी डॉ. सुहास गोपणे, कार्यक्रम अधिकारी डॉ. महेंद्र वैरागे आणि कार्यक्रम अधिकारी प्रा. शुभांगी खुडे-आव्हाण यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.या सात दिवसीय शिबिरात ग्रामस्वच्छता, जलसंधारण, आरोग्य तपासणी, महिला सक्षमीकरण, कृषीविषयक मार्गदर्शन, व्यक्तिमत्त्व विकास आणि क्रीडा-सांस्कृतिक उपक्रम असे विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. शिबिराच्या पहिल्या दिवशी ग्रामस्वच्छता अभियान हाती घेण्यात आले, ज्यामध्ये गावातील सार्वजनिक ठिकाणे, शाळा, मंदिर परिसर आणि रस्त्यांची स्वच्छता करण्यात आली. दुसऱ्या दिवशी वृक्षारोपण आणि जलसंधारण मोहीम राबवली जाणार असून, गावातील शेतकऱ्यांसाठी जलसंवर्धन तंत्रज्ञान व आधुनिक कृषी पद्धतींवर मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात येणार आहे. तिसऱ्या दिवशी ग्रामस्थांसाठी आरोग्य तपासणी शिबिर होणार असून, डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली रक्ततपासणी, दंतचिकित्सा आणि सामान्य आरोग्य तपासणी केली जाणार आहे.चौथ्या दिवशी महिला सक्षमीकरणावर विशेष भर दिला जाणार असून, महिला बचत गट, स्वयंरोजगार आणि आरोग्य व्यवस्थापन या विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. पाचव्या दिवशी कृषीविषयक मार्गदर्शन शिबिर होणार असून, जैविक शेती, सेंद्रिय खतांचे महत्त्व आणि आधुनिक शेती यावर सखोल चर्चा केली जाणार आहे.सहाव्या दिवशी विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्त्व विकास आणि नेतृत्व कौशल्यावर आधारित कार्यशाळा घेतली जाणार आहे. संध्याकाळी क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आह

# आय एस ओ मानांकित प्रा. शाळा नफरवाडीची शैक्षणिक सहल संपन्न

पाटोदा (प्रतिनिधी) तालुक्यातील नफरवाडी गावच्या आय एस ओ मानांकित जि.प.प्रा. शाळेची शैक्षणिक सहल नुकतीच संपन्न झाली. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी त्यांना शालेय पुस्तकी अनुभवाबरोबरच प्रत्यक्ष अनुभव मिळण्यासाठी,महाराष्ट्राचा ऐतिहासिक वारसा असणा-या वास्तू, नैसर्गिक ठिकाणे याबद्दलची प्रत्यक्ष माहिती मिळवण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील असणारे शाळेचे मुख्याध्यापक आण्णासाहेब खंडागळे सरांच्या तसेच जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी बोंदार्डे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व सर्व स्टाफच्या नियोजनाने या सहलीचे आयोजन करण्यात आले होते. सविस्तर माहिती अशी की ही सहल दिनांक २६ जानेवारी ते ३१ जानेवारी या कालावधीत संपन्न झाली.ही सहल पाटोदा-पंढरपूर(पांडुरंग दर्शन)-नरसोबाची वाडी-(दत्त मंदिर,पंचगंगा आणि कृष्णा नदी संगम) कोल्हापूर-शाहू पॅलेस-कणेरी मठ (बोटॅनिकल गार्डन,म्युझियम, ग्रामजीवन खेडे,आरसेमहाल, भूतबंगला)-महालक्ष्मी मंदिर-रंकाळा तलाव-ज्योतिबा- पन्हाळा (तिनदारवाजा,अंधार बाव,काली बुरुज,अंबरखाना धान्याचे कोठार,बाजीप्रभू देशपांडे यांचा पुतळा,बालेकिल्ला,शिवा काशीद स्मारक-नानिज-रत्नागिरी- रत्नदुर्ग-मत्सालय-गणपतीपुळे(गणपती मंदिर,अरबी समुद्र)-रायगड(महादरवाजा, हत्ती तलाव,चोरदिंडी,गंगासागर तलाव,स्तंभ,मेणा दरवाजा,सिंहासन राजदरबार,राजसभा,नगारखाना,बाजारपेठ, राणी महाल,जगदीश्वर मंदिर,सेवेची ठायी तत्पर हिरोजी इंदुलकर यांच्याविषयीचा शिलालेख, महाराजांची समाधी,टकमक टोक,हिरकणी बुरुज,पाचाड जिजाऊ माँसाहेब यांचा वाडा आणि समाधी) -महाड चवदार तळे-प्रतापगड(छत्रपती शिवाजी महाराज अफजलखान भेटीचे ठिकाण-महाबळेश्वर (पाच नद्यांचा उगम,थंड हवेचे ठिकाण,इको पॉइंट



सावित्री पॉइंट अर्थर सीट पॉइंट,हंटर पॉइंट) -भिलार (पुस्तकांचे गाव)-मांढरदेवी-प्रतिबालजी सासवड-जेजुरी-मोरगाव-बारामती मार्गे प्रवास करत पाटोदा येथे आली. या सहलीत विद्यार्थ्यांना ऐतिहासिक वारसा लाभलेल्या वास्तू तसेच स्थळांची प्रत्यक्ष अनुभुती मिळाली. याचा अमूल्य असा फायदा त्यांना इतिहास व भूगोल विषय अभ्यासताना होणार आहे. सदरील सहलीत विद्यार्थी व शिक्षकांनी वेगवेगळ्या धार्मिक,ऐतिहासिक ठिकाणांना भेटी दिल्या. रायगड, प्रतापगड आणि पन्हाळा किल्लूयाला भेट देऊन छत्रपती शिवरायांचा इतिहास विद्यार्थ्यांनी समजून घेतला . सदरील ठिकाणांची ऐतिहासिक व धार्मिक पार्श्वभूमी समजून घेतली . या शैक्षणिक सहलीमध्ये ४९ विद्यार्थी सहभागी झाले होते. पाटोदा आगाराची बस घेण्यात आली होती. यामध्ये बसचालक प्रकाश सानप यांच्या सहकार्याने उत्तम प्रवास झाला. शैक्षणिक सहल यशस्वी करण्यासाठी नफरवाडी शाळेचे मु.अ.श्री. खंडागळे सर,नफरवाडी शाळेतील जेष्ठ व अनुभवी शिक्षक मुरूमकर सर,श्री राऊत सर,श्रीम. काकडे मॅडम,श्रीम.कदम मॅडम,श्रीम.,श्रीम वावरे मॅडम आदींनी परिश्रम घेतले.

### चार भिंतीबाहेरील खरे जग दाखवण

**सहलीचा मुख्य उद्देश मुलांना शाळेच्या चार भिंतीबाहेरील खरे जग दाखवणे. त्यांना जगाची खरी ओळख करून देण्याचा प्रयत्न करणे, महाराष्ट्राचा ऐतिहासिक वारसा असणा-या वास्तू, नैसर्गिक,भौगोलिक,धार्मिक ठिकाणांची माहिती मिळवणे हा असतो आणि हा उद्देश आम्ही आयोजित केलेल्या सहलीमधून नक्कीच साध्य होणार आहे ...!!!**

नेहमीच नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणा-या या शाळेचे मुख्याध्यापक आण्णासाहेब खंडागळे सर व सर्व नफरवाडी शिक्षकवृंद यांचे नफरवाडी शा.व्य.समिती अध्यक्ष उत्तरेश्वर औटे,उपाध्यक्ष ,सर्व सदस्य तसेच गावचे सरपंच विद्याताई सवासे,उपसरपंच शितलताई तांबे,ग्रा.पं सदस्य आणि पाटोदा गटशिक्षणाधिकारी पिकवणे साहेब, जेष्ठ शिक्षणविस्ताराधिकारी बोंदार्डे साहेब यांनी तोंडभरून कौतुक केले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार ६ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com



## ना. पंकजाताई मुंडे बीडच्या संपर्कमंत्री, भाजपने दिली नवी जबाबदारी



बीड : राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे हयांची भारतीय जनता पक्षाने बीड जिल्हयाच्या संपर्कमंत्री म्हणुन नियुक्ती केली आहे. पक्ष आणि सरकारमध्ये समन्वय राहावा यासाठी संपर्क मंत्र्यांची घोषणा प्रदेशाध्यक्ष तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज पक्षाच्या बैठकीत केली. जेथे इतर पक्षांचे पालकमंत्री आहेत, तेथे भाजपने मंत्रिमंडळातील भाजपच्या मंत्र्यांकडे संपर्कमंत्री म्हणून जबाबदारी दिली आहे. या मंत्र्यांकडे एकप्रकारचे जिल्ह्याचे भाजपचे पालकत्वच असणार आहे. बीड जिल्ह्याच्या संपर्कमंत्री म्हणून राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान, पक्षाने दिलेली ही नवीन जबाबदारी निश्चित चांगल्या प्रकारे पार पाडू असं ना. पंकजाताई मुंडे यांनी म्हटलं आह

# कायदा व सुव्यवस्था पुनर्स्थापित करा अन उजणीचे पाणी बीडला द्या

## खा.बजरंग सोनवणे यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणविसांकडे पत्राद्वारे मागणी

बीड: बीड जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था ढासळली आहे. ती पुनर्स्थापित करण्यात यावी, याच बरोबर बीड जिल्ह्यातील शेतक-यांच्या जीवनात हरितक्रांती करण्यासाठी उजनी धरणातून १० टीएमसी पाणी बीड जिल्ह्यासाठी विशेष बाब म्हणून मंजूर करावे, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे खुंटेफळ (ता.आष्टी) येथील कार्यक्रमात निवेदनाव्दारे केली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, गेल्या काही वर्षांत बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती अत्यंत चिंताजनक बनली आहे. अतिराजकीय हस्तक्षेपामुळे पोलीस दलाला स्वतंत्रपणे आणि कार्यक्षमतेने कार्य करण्यास अडथळे येत आहेत. स्थानिक पातळीवर पोलीस प्रशासनावर अनावश्यक दबाव टाकला जात असून, कायद्याच्या अंमलबजावणीवर त्याचा प्रतिकूल परिणाम होत आहे. यामुळेच इतर सर्व बेकायदेशीर धंदे सोबतच जिल्ह्यात अपहरण, खंडणी, छळ, हत्या आणि इतर गंभीर गुन्ह्यांचे प्रमाण वाढले आहे. नागरिकांमध्ये पोलीस दलाविषयी अविश्वासाची भावना निर्माण झाली असून, कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे ढासळल्याचे चित्र दिसून येत आहे. जिल्ह्यात नवीन उद्योग येण्यास उद्योजकाचा निरुत्साह दिसून येतो. हे बदलणे आवश्यक आहे.



तर बीड जिल्हा हा कायमस्वरूपी दुष्काळप्रवण क्षेत्रांपैकी एक आहे. सरासरी पर्जन्यमान कमी असल्याने जिल्ह्यातील बहुतांश शेती कोरडवाहू आहे. परिणामी, शेतकरी अडचणीत सापडत असून रोजगारासाठी मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होत आहे. या परिस्थितीत सिंचनाच्या सोयी वाढवल्यास स्थलांतर थांबेल, शेती उत्पादन वाढेल आणि बेरोजगारीही कमी होईल. सध्या उजनी धरणातून अतिरिक्त पाणी नदीमार्गे वाहून जाते. जर त्यातील १० टीएमसी पाणी बीड जिल्ह्यासाठी विशेष बाब म्हणून मंजूर केले गेले, तर ते सीना नदीमधून लिफ्ट करून सीना-कोळेगाव प्रकल्प, त्यानंतर अपर मांजरा प्रकल्प आणि शेवटी मांजरसुंबा घाटमाथा येथे नेणे शक्य होईल. अशा प्रकारे पाटोदा, बीड, केज, धारूर आणि अंबाजोगाई तालुक्यांतील कोरडवाहू भागामधे नैसर्गिक प्रवाहाद्वारे सिंचनाची सोय करता येईल, यामुळे या योजनेच्या तांत्रिक आणि आर्थिक व्यवहार्यता तपासण्यासाठी तत्काळ सर्वेक्षण करण्याचे आदेश द्यावेत, बीड जिल्ह्यासाठी विशेष बाब म्हणून १० टीएमसी पाणी मंजूर करावे, या योजनेसाठी आवश्यक निधी आणि मंजुरीस प्राधान्य द्यावे, अशी मागणी केली आहे.००कायदा व सुव्यवस्थेसाठी उपाययोजना१. बीड जिल्ह्यातील पोलीस दलाला राजकीय हस्तक्षेपापासून मुक्त करावे, जेणेकरून ते निष्पक्षपणे आणि नियमाप्रमाणे कार्य करू शकतील.२. कायदा व सुव्यवस्था राखण्यास अडसर ठरणा-या पोलीस अधिका-यांची तसेच कर्मचा-यांची तातडीने जिल्ह्याबाहेर बदली करण्यात यावी.३. जिल्ह्यात गुन्हेगारी नियंत्रणासाठी स्वतंत्र चौकशी समिती नेमून आवश्यक त्या सुधारणा सुचवाव्यात.

# खा.बजरंग सोनवणे कडून विघनवाडी ते बीड रेल्वेची चाचणीची पाहणी

बीड : अनेक वर्ष रेल्वेची बीडकरांनी प्रतिक्षा केली. ही प्रतिक्षा आता संपत असून काल विघनवाडी ते राजुरी आणि आज विघनवाडी ते बीड रेल्वेची जलदगती चाचणी होत आहे. आज सकाळी विधनवाडी ते नवगण राजुरी रेल्वे चाचणीची खा.बजरंग बप्पा सोनवणे, आमदार संदीप भैया क्षिरसागर, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी पालवन (चराटा रोड) येथे पाहणी केली. बीडला रेल्वे आलीच पाहिजे,अशा घोषणा मागील अनेक वर्षांपासून सुरू होत्या. यासाठी आंदोलने आणि मोर्चेही झाले. अहिल्यानगर



ते बीड या २६१ कि.मी. अंतराच्या रेल्वेसाठी बीड वासियांचा गेल्या तीन ते दशकापासून संघर्ष सुरू आहे. पहिल्या टप्प्यात अहिल्यानगर नारायणडोह या ७ कि.मी.च्या अंतराचे काम पूर्ण झाले. पुढे टप्प्याने काम सुरू होते. अंमळनेर येथे रेल्वे येऊन थांबली होती. रेल्वेपुढे अडथळ्याची शर्यत होती. सदरील आडथळे पुर्ण करण्यासाठी खा. बजरंग सोनवणे यांनी लक्ष घातले आणि अडथळ्यांची शर्यत संपत आली. आणि आज विघनवाडी ते राजुरी अशी रेल्वे चाचणी झाली तर आज ५ फेब्रुवारी रोजी राजुरी ते बीड या नवीन लोहमार्गावर हायस्पीड रेल्वेची चाचणी घेण्यात येत आहे. आज प्रत्यक्षात बीड शहरात रेल्वे जलदगतीने दाखल होणार असल्याने हा दिवस शहरवासियांसाठी सुवर्ण अक्षरांनी लिहीला

## केज येथील कर्क व स्त्री रोग मोफत आरोग्य शिबिराचा शेकडो रुग्णांनी घेतला लाभ



केज - ४ फ्रेब्रुवारी हा कँन्सर दिवस म्हणून साजरा केला जातो या निमित्ताने केज शहरातील सामाजिक संस्था कै. अप्पासाहेब देशमुख बहुद्देशीय सेवा भावी संस्था, उपजिल्हा रुग्णालय, श्रेया हास्पिटल केज यांनी संयुक्त विध्यामाने आयोजित केलेल्या कर्करोग व स्त्री रोग मोफत शिबिराचे उदघाटन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात यांच्या हस्ते करण्यात आले याशिबिरात शेकडो रुग्णांची आरोग्य तपासणी केली. यामध्ये,कर्करोग,स्त्रीरोग,गुडगे दु:खी,अर्थो,तसेच इतर मोफत आरोग्य तपासणी व उपचार करण्यात आले या शिबिरात सात रुग्ण संशयत आढळून आले.तसेच दोन रुग्णांना कँन्सर अढळले आहे. या शिबिरात डॉ. राघवेंद्र राजेश्वरकर, बार्शी/मुंबई, डॉ.नंदकुमार पानसे,उपजिल्हा रुग्णालयचे अधिक्षक डॉ.दत्तात्रय केंद्रे, श्रेया हास्पिटल स्त्री रोग तज्ञ डॉ.योगेश्वरी थोरात (चव्हाण) डॉ. तेजस थोरात, डॉ.स्नेहा साखरे,डॉ. शितल नेहरकर, डॉ.श्राध्दा विकास मिरगणे, डॉ.नागरगोजे, टिमच्या उपस्थितीत शिबीर पार पडले तसेच प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते प्रा.हनुमंत भोसले,महेश जाजू,सय्यद सादात मंत्री,सलिम शेख,जब्बार पठाण,तसेच श्रेया हास्पिटलचे सर्व कर्मचारी,उपजिल्हा रुग्णालयचे रत्नदीप चाटे औषनिर्माण,अधिकारी सविता सावंत हे हजर होते.

# शिवजन्मोत्सवानिमीत्त ज्ञानेश महाराव यांचे व्याख्यान

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : दरवर्षीप्रमाणे यावर्षीही मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड व इतर कक्ष आयोजित सार्वजनिक शिवजन्मोत्सव नवा मोंढा नांदेड च्या वतीने १९ फेब्रुवारी रोजी शिवजन्मोत्सव साजरा करण्यात येणार आहे.त्या कार्यक्रमात ज्ञानेश महाराव यांचे व्याख्यान आयोजित केले आहे. मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष मा युगपुरुष पुरुषोत्तम खेडेकर साहेबांनी मराठा सेवा संघाची स्थापना करून १९९० पासुन महाराष्ट्र पुरोगामी चळवळ तळागाळापर्यंत पोहचवली व पंचवीस वर्षांपूर्वी छ.शिवाजी महाराजांची जयंतीच्या तारीख,तीथी चा खेळ संपवुन १९ फेब्रुवारी रोजी खरी तारीख प्रबोधनातुन सागुन महाराष्ट्रासह जगभरात जन्मोत्सव साजरा करणे चालु झाले.तेव्हापासुन नादेड मराठा सेवा संघ १९ फेब्रुवारी रोजी शिवजन्मोत्सव साजरा करते.यावर्षी



प्रखर वक्ते ज्ञानेश महाराव यांचे व्याख्यान नवा मोंढा नांदेड येथे सकाळी ११.०० वाजता आयोजित केले आहे.तरी व्याख्यानास जास्तीत जास्त संख्येने यावे.तसेच ज्या शिवप्रेमींना या शिवजन्मोत्सवासाठी मदत करायची आहे त्यांनी जास्तीत जास्त रुपये भाग्यनगर नांदेड येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेत मराठा सेवा संघाच्या नावाने असलेल्या ८०००९३१७२६४ हे खातेनंबर ज्याचा आय.एफ.एस.सी. कोड MAHB०००४१३६ असलेल्या खात्यात जमा करावी रोख निधी कोणालाही देऊ नये व ९४२२१७०६२० या मोबाईल नंबर वर खात्री करून घ्यावी असे आवाहन मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड,विर भगतसिंग विद्यार्थी परिषद,शिक्षण महर्षी डॉ पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषद व इतर कक्ष आयोजित सार्वजनिक शिवजन्मोत्सव नवा मोंढा नांदेडच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.

# शासकीय कार्यालयामध्ये सौरऊर्जेच्या वापराकडे विशेष लक्ष द्या : उपमुख्यमंत्री अजित पवार

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : केंद्र व राज्य शासनाच्या अक्षय ऊर्जा निर्मिती संदर्भात सर्व जिल्ह्यांनी सकारात्मकतेने काम करावे. जिल्ह्याच्या वार्षिक आराखड्यामध्ये शाळा, कार्यालयांच्या सौर ऊर्जे संदर्भात प्रस्तावाचा समावेश करावा, अशी सूचना राज्याचे अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली.

उपमुख्यमंत्री कार्यालय मंत्रालय मुंबई येथून सर्व जिल्ह्यांच्या जिल्हा वार्षिक योजना ( डीपीसी ) संदर्भातील राज्यस्तरीय बैठक दृकश्राव्य माध्यम द्वारे घेण्यात आली. या बैठकीला मंत्रालयातून इतर मागास बहुजन कल्याण,पशुसंवर्धन,अपारंपारिक ऊर्जा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे,आमदार प्रताप पाटील चिखलीकर, यांची उपस्थिती होती. बैठकीला वित्त नियोजन राज्यमंत्री अँड.आशिष जयस्वाल, नवी दिल्लीवरून राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण,अप्पर मुख्य सचिव राजगोपाल वर्मा,वित्त व नियोजन विभागाचे वरिष्ठ अधिकारी दृकश्राव्य माध्यमाने उपस्थित होते.

तर नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयातून



दृकश्राव्य माध्यमातून आमदार श्रीजया चव्हाण, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, सहाय्यक जिल्हाधिकारी अनुष्का शर्मा नांदेड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर आडे व सर्व विभाग प्रमुखांची उपस्थिती होती.

यावेळी लोकप्रतिनिधींनी गाव तिथे स्मशानभूमी, पानंद रस्ते, शाळांची दुरुस्ती, मराठवाडा मुक्ती संग्राम कार्यक्रमांसाठी वाढीव निधी, माळेगाव यात्रा, जलजीवन मिशन, नव्या रोहित्रांसाठी वाढीव निधी, तसेच शाळा व सर्व शासकीय कार्यालयांवर सोलर सिस्टम बनविण्याबाबतची मागणी केली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सर्व लोकप्रतिनिधी व जिल्हाधिकारी यांनी सादर केलेल्या प्रस्तावाला समजून घेतले. उपस्थित लोकप्रतिनिधींच्या प्रारूप आराखड्यासंदर्भातील मतांना लक्षात घेतले. मुख्यमंत्र्यांसोबतच्या बैठकीमध्ये नांदेड जिल्ह्याच्या अंतिम आराखड्याला मान्यता देण्यात येईल असे त्यांनी स्पष्ट केले.

तत्पूर्वी, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण सन २०२५ -२६ च्या प्रारूप आराखड्याचे सविस्तर सादरीकरण केले. जिल्ह्यासाठी नियोजन विभागाने दिलेल्या रुपये ४७७.४७ कोटी मर्यादित आराखडा सादर करून विविध योजनेसाठी रुपये २०० कोटींची अतिरिक्त मागणी यावेळी करण्यात आली.

## नांदेडकरांचा कार्यकर्तृत्वाला सलाम !

### जिल्हाधिका-यांना निरोप द्यायला रिघ लागली

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : बदली शासकीय अधिका-यांच्या आयुष्यातील आकस्मिक मात्र अविभाज्य घटना. मात्र काही अधिका-यांच्या बदलीने समाजमन हळवे होते. आज कला, क्रीडा, सांस्कृतिक, राजकिय, सामाजिक, प्रशासकीय व पत्रकारिता क्षेत्रातील अनेकांची थबकलेली पाऊले जिल्हाधिकारी कार्यालयात बघायला मिळाली. जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांची काल बदली झाली. अडीच वर्षांपासून अधिक न बोलता प्रत्यक्ष काम करणारे एक व्यक्तिमत्त्व नव्या ठिकाणी कार्यसिद्धीसाठी निघाले आहेत. दिलदार ! नांदेडकरांनी आज या कार्यकर्तृत्वाला आदराने सलाम केला.



दिवसभरात विविध क्षेत्रातील नागरिकांनी एका गुणवान, मितभाषी,कार्यतत्पर अधिका-याला निरोप दिला. काही पत्रकारांनी यावेळेत सिंहावलोकन केले. जिल्हाधिका-यांशी चर्चा झाली. गेल्या अडिच वर्षातील एक - एक कामांची यादीच पुढे आली. सुरुवात झाली ती सप्टेंबर २०२२ रोजीच्या रुजू होण्यापासून. जिल्हाधिकारीही हळवे झाले. बदली अनिवार्य ,अपरिहार्य असते पण नांदेड सारखा जिल्हा कायम मनात राहणार आहे. एक गोड आठवणही त्यांनी सांगितली. माझ्या चिमुकलीचा जन्म नांदेडचा आहे, असे ते गौरवाने म्हणाले. शेतक-यांच्या योजनांमध्ये त्यांना विशेष आवड होती. त्यामुळेच त्यांनी उत्पन्न वाढीसाठी उच्च मूल्य शेती अभियान सुरू केले. केळी निर्यात संदर्भात कार्यशाळा आयोजित केली. रेशीम, फलशेती याबाबतही त्यांनी लक्ष घातले. जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानात जवळपास ८१२ कोटींची मदत त्यांच्या कार्यकाळात झाली. सेंद्रीयशेती संदर्भातही काम उल्लेखनीय ठरले. संकट कोणतेही येऊ दे रात्री-बेरात्री शून्य इगो ठेऊन मदतीला धावणारा अधिकारी म्हणून अनेकांनी त्यांना लक्षात ठेवले आहे. त्यामुळेच त्यांच्या काळात अभ्यागतांच्या रांगा दिसायच्या. केवळ गर्दीसाठी नव्हे तर भेटीतून शंभर टक्के तोडगा काढण्याची त्यांची क्षमता त्यांच्याकडे होती. गर्दीला रिझल्ट हवा असतो. प्रत्येकाला शांततेने ऐकण्याचे औदर्य त्यांच्याकडे होते. मराठवाडा मुक्तिसंग्रामच्या सुवर्ण महोत्सवी आयोजनात त्यांनी घेतलेला पुढाकार स्मरणीय आहे. जलसंधारणाच्या कामात त्यांनी घेतलेला पुढाकार लक्षणीय आहे. मन्याड नदीच्या खोलीकरणात दाखविलेली रुची सुखद आठवण आहे. १६४ ठिकाणी गाळ काढण्याचे काम झाले आहे. यासोबतच माझी शाळा हा एक सामाजिक उपक्रम नांदेडकरांच्या कायम स्मरणात राहणार आहे. प्रशासनात निवृत्त झालेल्या अधिका-यांनी एक-एक शाळा दायित्व म्हणून सांभाळायला घेतली. आवश्यक सुधारणांसाठी पाठपुरावा केला आणि त्यातून एक मोठी सामाजिक चळवळ जिल्ह्यामध्ये उभी राहिली. अंतर्गत रस्ते व प्रमुख रस्त्यांच्या दुरूस्ती व देखभालीबाबत ते अतिशय आग्रही होते त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील प्रमुख शहरांना जोडणा-या रस्त्यांची त्यांनी विशेष काळजी घेतली. येणा-या प्रत्येकाकडे एक आठवण होती. हस्ते पर हस्ते झालेल्या मदतीची नोंद होती. कुणाकडे शाळा कुणाकडे दवाखाना अद्यावत झाल्याची आठवण होती. अडलेल्या खाजगी कामांनाही मोकळ्या केल्याची आठवण होती तर काही विद्यार्थ्यांनी तातडीने मिळालेल्या प्रमाणपत्राची आठवण काढून दिली. कर्मचा-यांनी त्यांच्यासोबत घालवलेल्या काही क्षणांची आठवणही सांगितली ज्यांना काही बोलता आले नाही कधीच, त्यांनीही आज आभार व्यक्त केले.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com